हृदय, रक्तवाहिन्यांसाठी गर्भनिरोधके धोकादायक

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : गर्भधारणा रोखण्यासाठी हार्मोनल गर्भनिरोधक हा एक खात्रीशीर उपाय मानला जातो. हार्मोनल गर्भनिरोधकांमध्ये बरेच प्रकार आहेत. त्यामध्ये तोंडावाटे घेण्याच्या गोळ्या, योनीमार्गात लावायची रिंग, गर्भनिरोधक स्किन पॅचेस, हार्मोन्स सोडणारी गर्भनिरोधक कॉइल्स असे प्रकार आहेत. एका अभ्यासात असे आढळून आले आहे की हार्मोनल गर्भनिरोधकांमुळे सौम्य स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका वाढतो. कोपनहेगन युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी सांगितले की, एकंदरीत जोखीम कमी असली, तरी डॉक्टरांनी गर्भनिरोधक लिहून देण्यापूर्वी संभाव्य धोक्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

डेन्मार्कमध्ये १० वर्षांहून अधिक काळ २० लाखांहून अधिक महिलांचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांना असे आढळून आले की, सामान्यतः वापरले जाणारे हार्मोनल गर्भनिरोधक म्हणजेच एस्ट्रोजेन-प्रोजेस्टिन गोळीमुळे स्ट्रोक आणि हृदयविकाराचा धोका दुप्पट आहे. एका वर्षासाठी एकत्रित गोळी वापरणाऱ्या प्रत्येक ४,७६० महिलांमागे एक अतिरिक्त स्ट्रोक आणि प्रतिवर्ष वापरणाऱ्या प्रत्येक १० हजार महिलांना एक अतिरिक्त हृदयविकाराचा झटका आला आहे, असे संशोधकांनी सांगितले. अभ्यासात असेही आढळून आले की, योनीच्या अंगठी आणि पॅच यांसारख्या गर्भनिरोधकांमध्ये जास्त धोका आढळून आला. योनीच्या अंगठीमुळे इस्केमिक स्ट्रोकचा धोका २.४ पट आणि हृदयविकाराचा धोका ३.८ पटीने वाढला, तर पॅचमुळे इस्केमिक स्ट्रोकचा धोका ३.४ पट वाढला, असे संशोधकांनी म्हटले आहे.

ठेवींवर आकर्षक व्याजदर
सर्वसाधारण/ संस्था ठेवीदार 7.60% | ज्येष्ठ नागरिक 8.00%
मुदत : १३ महिने
*अटी लागू. (ROI p.a.)
कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
Toll Free No.: 1800 233 0234

तन्वी हर्बल्स मानसोपचार, कौंसेलिंग फ्री चेकअप क्लिनिक,मधूश्री,विष्णुनगर,ठाणे. 11 ते 1 : अपॉइंटमेंट : 9820075813

१३ हजार कांदा उत्पादकांना अनुदानाची प्रतीक्षा

पीक पेरा नोंदवला नसल्याच्या तांत्रिक कारणामुळे गोंधळ

लोकसत्ता वार्ताहर

मालेगाव : २०२२-२३ रब्बी हंगामात भाव गडगडल्यानंतर जाहीर करण्यात आलेल्या सानुग्रह अनुदानाचा लाभ काही कांदा उत्पादकांना झाला. परंतु, सातबारा उताऱ्यावर ई-पीक पेरा न नोंदविलेल्या, आधी अपात्र आणि नंतर पात्र ठरविण्यात आलेल्या राज्यातील सुमारे १३ हजार शेतकऱ्यांना २५ कोटींच्या अनुदानासाठी दोन वर्षांपासून प्रतीक्षा करावी लागत आहे.

कांदा पिकाची लागवड करूनही केवळ पीक पेरा नोंदवला नसल्याच्या तांत्रिक कारणामुळे शेतकरी अनुदानापासून वंचित राहू नये म्हणून शासनाने तलाठी, कृषी सहायक आणि ग्रामसेवक यांच्या त्रिस्तरीय समितीने केलेले स्थळ पंचनामे या अनुदानासाठी गृहित धरण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ज्या शेतकऱ्यांनी असे पंचनामे सादर केले, त्या अपात्र शेतकऱ्यांना जिल्हा छाननी समित्यांनी केलेल्या फेर तपासणीत नंतर पात्र ठरविले गेले. अशा पात्र शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कार्यवाही करण्यासाठी पणन विभागाच्या उपसंचालकांनी ऑगस्ट २०२४ मध्ये शासनास प्रस्ताव पाठवला होता. त्यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. जवळपास १३ हजार शेतकऱ्यांचे सुमारे २५ कोटींचे अनुदान त्यामुळे दोन वर्षांपासून रखडले आहे. त्यात नाशिक, धाराशिव, पुणे, सांगली, सातारा, धुळे आणि जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा समावेश आहे.



राज्यातील दोन लाख ९१ हजार २८८ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात यापूर्वीच ८५१ कोटी ६७ लाख रुपये जमा झाले आहेत. ई-पीक पाहणीत कांदा पिकाची नोंद नसलेल्या शेतकऱ्यांसाठी तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहायक यांच्या समितीमार्फत पंचनामे केले गेले. समितीच्या अहवालानुसार पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच अनुदान जमा केले जाईल. **-जयकुमार रावल,** पणन मंत्री

एकट्या नाशिक जिल्ह्यातील नऊ हजार ९८८ शेतकऱ्यांचे सुमारे १८ कोटी ५८ लाख रुपयांचे कांदा अनुदान शासनाकडे प्रलंबित आहे. त्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे.
-बिंदूशेठ शर्मा, प्रदेश सरचिटणीस, भाजप किसान मोर्चा

देशातील पहिल्या 'रोड ट्रेन'ला हिरवा झेंडा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी देशातील पहिल्या 'रोड ट्रेन'ला नागपुरात हिरवा झेंडा दाखवला. वोल्वो ट्रक्स आणि डेल्हीव्हरी लिमिटेडने हे वाहन दळणवळण उद्योगातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी तयार केले आहे.

'रोड ट्रेन'ची कल्पना २०२० मध्ये मांडण्यात आली होती. त्यानंतर केंद्रीय परिवहन खात्याने २५.२५ मीटर लांबीपर्यंतची वाहने चालविण्याची परवानगी दिली. यात एक ट्रॅक्टर युनिट असते. जे दोन किंवा अधिक ट्रेलर ओढते, ज्यामुळे एकाच वेळी अधिक प्रमाणात मालवाहतूक होते. वोल्वो ट्रक्सच्या 'रोड ट्रेन'मध्ये एकत्रितपणे १४४ घनमीटर माल वाहून नेण्याची क्षमता आहे. ही क्षमता सेमी-ट्रेलरपेक्षा ५० टक्के अधिक आहे. अनेक प्रशिक्षण आणि चाचण्यानंतर या 'रोड ट्रेन'ला नागपूर आणि भिवंडी ते दिल्ली या शहरादरम्यान धावण्यासाठी केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओआरटीएच) आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय) कडून परवानगी देण्यात आली.

१.५ टक्के निर्यात वाढीची शक्यता

चीनमध्ये लॉजिस्टिक मूल्य ८ टक्के, अमेरिकेत १२ टक्के आणि भारतात १६ टक्के आहे. पुढील दोन वर्षांत ते ९ टक्क्यांवर आणण्याचे उद्दिष्ट आहे. हे झाल्यास निर्यात १.५ टक्के वाढू शकते, असे मत यावेळी नितीन गडकरी यांनी व्यक्त केले.

'आयएसआय'ला गोपनीय माहिती पुरविल्याचे प्रकरण

डॉ. प्रदीप कुरुलकर याच्याविरुद्ध आरोप निश्चिती

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला (आयएसआय) संरक्षणविषयक गोपनीय माहिती पुरविल्याप्रकरणी कारागृहात असलेला लष्कराच्या संशोधन आणि विकास संस्थेचा (डीआरडीओ) माजी संचालक, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप कुरुलकर याच्याविरुद्ध आरोप निश्चितीचा मसुदा विशेष न्यायालयात सादर करण्यात आला. त्यामुळे आता या खटल्याच्या प्रत्यक्ष सुनावणीस लवकरच सुरुवात होणार आहे.

विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार यांनी विशेष न्यायाधीश व्ही. आर. कचरे यांच्या न्यायालयात आरोप निश्चितीचा मसुदा सादर केला. कुरुलकरविरुद्ध राज्य दहशतवादविरोधी पथकाकडून (एटीएस) २०२३ मध्ये दोन हजार पानांचे आरोपपत्र सादर केले. त्याच्याविरुद्ध आरोप निश्चित केल्यानंतर खटल्याची सुनावणी सुरू करण्यासाठी आता सरकार पक्षाकडून प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

कुरुलकर हा पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात आला होता. समाज माध्यमातून झारा दासगुप्ता या महिलेच्या संपर्कात तो होता. त्याने भारतीय संरक्षण सिद्धतेविषयीची गोपनीय आणि संवेदनशील माहिती दासगुप्ताला पुरविली होती. प्रत्यक्षात दासगुप्ता ही पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील महिला होती. कुरुलकरला एटीएसने ४ मे २०२३ रोजी अटक केली होती. त्याच्याकडून लॅपटॉप, मोबाइल संच, अन्य इलेक्ट्रॉनिक साधने जप्त करण्यात आली होती. संबंधित इलेक्ट्रॉनिक साहित्य न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेत तांत्रिक विश्लेषणात पाठविण्यात आली होती.

तांत्रिक विश्लेषणातून तो पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात असल्याचे उघड झाले होते. कुरुलकर सध्या येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. त्याने त्याच्या वकिलांमार्फत जामीन मिळवण्यासाठी अर्ज सादर केला होता. गेल्या वर्षी विशेष न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला.

देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचविणारे कृत्य

कुरुलकरने देशाच्या सार्वभौमत्वाला बाधा पोहोचविणारे कृत्य केले आहे. त्याने संरक्षणविषयक गोपनीय आणि संवेदनशील माहिती पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला दिली आहे. या खटल्याचा निकाल लवकर लागावा, तसेच प्रत्यक्ष सुनावणीस सुरुवात व्हावी, या दृष्टीने सरकार पक्षाकडून आरोप निश्चितीचा मसुदा न्यायालयात सादर केला आहे. संबंधित मसुदा वगळावा (डिस्चार्ज), अशी मागणी कुरुलकरच्या वकिलांनी केली आहे, असे विशेष सरकारी वकील उज्ज्वला पवार यांनी नमूद केले.

शनिदेवाला यापुढे खाद्यतेलाचाच अभिषेक

शनि शिंगणापूर देवस्थानचा निर्णय; १ मार्चपासून अंमलबजावणी

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : शनिशिंगणापूर येथील शनिदेवाची मूर्ती असलेल्या शिळेवर यापुढे खाद्यतेलाच (ब्रँडेड) अभिषेक करण्याचा निर्णय शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ तसेच ग्रामसभेने घेतला आहे. याची अंमलबजावणी १ मार्चपासून होणार आहे.

शनिशिंगणापूर देवस्थान जगभरात प्रसिद्ध आहे. भाविक श्रद्धेने शनिदेवाला तेल अर्पण करतात. याच तेलाबाबत देवस्थान विश्वस्त मंडळाने निर्णय घेतला आहे. शनिमूर्तीच्या शिळेला भाविकांकडून अनेकदा अखाद्यतेलही अर्पण केले जाते. अखाद्यतेलामध्ये रसायने असण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे मूर्तीची झीज होऊ शकते. या शक्यतेमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देवस्थानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष दरंदले यांनी दिली.

देवस्थान विश्वस्त मंडळाने या संदर्भात परिपत्रक जारी केले असून, त्याची माहिती शनिशिंगणापूर परिसरातील खासगी व्यावसायिक, आवारातील दुकानदार, गाळेधारक अशा सुमारे ३०० जणांना दिली आहे. दरम्यान, आता या निर्णयावर काय प्रतिक्रिया उमटते ते पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

शनिमूर्तीच्या शिळेची झीज रोखण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यापुढे अखाद्य सुटे तेल शिळेवर वाहू दिले जाणार नाही. याची अंमलबजावणी १ मार्चपासून होणार असून यासाठी महाद्वारावर कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.
-गोरक्ष दरंदले, मुख्य कार्यकारी अधिकारी, शनैश्वर देवस्थान

सोलापुरात वाहन अपघातात तिघांचा मृत्यू

सात जखमी

लोकसत्ता प्रतिनिधी

सोलापूर : सोलापूर-हैदराबाद महामार्गावर शहराजवळ एका फॅब्रिकेशन कारखान्यात मालवाहू वाहन घुसून झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर अन्य सात जण जखमी झाले. शनिवारी सायंकाळी हा अपघात झाला. अपघातग्रस्त वाहनाने प्रथम एका दुचाकीस्वाराला धडक दिली आणि त्यानंतर ताबा सुटल्याने रस्त्याच्या कडेला फॅब्रिकेशनच्या कारखान्यात हे वाहन घुसले.

या अपघातात दुचाकीस्वार आसीफ चांदबाशा बागवान (वय ४५, रा. दर्गोपाटील नगर, हैदराबाद रोड, सोलापूर) यांच्यासह तोहीद माजीद कुरेशी (वय २३, रा. सरवदे नगर, हैदराबाद रोड, सोलापूर) आणि विवेकानंद राजकुमार दिवस (वय ५२, रा. सतनाम चौक, उत्तर सदर बाजार, सोलापूर) या तिघा जणांचा जखमी होऊन मृत्यू झाला.

जखमींमध्ये वाजीद आसीफ कुरेशी (वय ४९, रा. सरवदेनगर, हैदराबाद रोड, सोलापूर), माजीद महिबूब चौधरी (वय ३०), कयुम बादशाह बेपारी (वय २८, रा. मैंदर्गी, ता. अक्कलकोट) यांचा समावेश आहे.

त्यांच्यावर छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरू आहेत. अन्य चार जखमींना एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हे सिमेंटवाहू वाहन सोलापूरहून हैदराबादच्या दिशेने निघाले होते.

ओएनजीसी ONGC
ONGC
फ्रंटियर बेसिन्स, देहरादून
सूचना
परियोजना – "मेसर्स ऑयल एंड नेचुरल गैस कारपोरेशन लिमिटेड द्वारा, NM-ONHP-2020/1 ब्लॉक, धुले, जलगांव एवं नंदुरबार, महाराष्ट्र में **03 अन्वेषणात्मक कूपों के वेधन हेतु**", पर्यावरण, वन एवं जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, ने पर्यावरणीय स्वीकृति प्रदान की है और ईसी पहचान सं० EC24C0302MH5407789N दिनाँक **03.07.2024** को जारी की गयी है। उक्त पर्यावरणीय स्वीकृति की प्रतियाँ एमपीसीबी (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड) के पास उपलब्ध हैं और पर्यावरण मंत्रालय की वेबसाइट **https://parivesh.nic.in** पर भी देखी जा सकती हैं।

ॲक्सिस बँक लि. | शाखा कार्यालय : १ ला मजला, माझदा टॉवर्स, त्र्यंबक नाका, जिल्हा परिषदेसमोर, जीपीओ रोड, नाशिक-४२२००१. | अपेंडिक्स-IV [रूल ८(१)] ताबा नोटीस
ज्याअर्थी खाली सही करणार **ॲक्सिस बँक लि.** अधिकृत अधिकारी यांनी दि सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(१२) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या **रूल ३** अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून कर्जदार/ सह-कर्जदार/गहाणदार/जामीनदार **१) श्री. गजेंद्र मनोहर डांगळे, २) सौ. निवेदिता गजेंद्र डांगळे, दोन्ही रा.** फ्लॅट नं.१२, धनलक्ष्मी अपार्टमेंट, भाऊसाहेब हिरे नगर, गणेश बाबा मंदिराजवळ, पंचवटी, नाशिक-४२२०११, **तसेच :** मु.पो. पिंपळसे, प्राथमिक विद्या मंदिर च्या मागे, ता.निफाड, जि.नाशिक-४२२३०२, **तसेच :** फ्लॅट नं.२, पहिला मजला, साई आनंद अपार्टमेंट, आगरटाकळी शिवार, नाशिक-४२२३०६ यांना **दि. २१/०६/२०२१** रोजी मागणी नोटीस बजावली होती की, त्यांनी सदर नोटीसीत नमूद केलेली **रु. १६,१२,१३३/- (रुपये सोळा लाख बारा हजार एकशे तेहतीस फक्त) दि.१७/०६/२०२१ रोजी देय रक्कम आहे आणि त्यावरील पुढील व्याजदरासह देय तारखेपर्यंत,** अशी सर्व रक्कम सदर नोटीसीच्या तारखपेासुन **६० दिवसांच्या** आत परत करावी.
कर्जदार/सह-कर्जदार/गहाणदार/जामीनदार सदर रक्कम परत करण्यास असमर्थ ठरल्यामुळे विशेषत: वर नमूद केलेले कर्जदार तसेच सर्वसाधारण जनता यांना नोटीस देण्यात येते की, खाली सही करणार यांनी सदर कायद्याच्या सेक्शन १३(४) आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या रूल ६ व ८ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून तसेच माननीय मुख्य न्यायदंडाधिकारी, नाशिक यानी **दि. ११/११/२०२२** रोजीच्या **फौ.चौ.अर्ज क्र. ३३१/२०२२** संदर्भात जारी केलेल्या आदेशानुसार खाली नमुद केलेल्या मालमत्तेचा **दि. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.**
विशेषत: कर्जदार, जामीनदार तसेच सर्वसाधारण जनता यांना सावध करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्ता संदर्भात कोणताही व्यवहार करू नये. असा व्यवहार केल्यास तो **ॲक्सिस बँक लि., नाशिक,** यांना येणे असलेली **रु. १६,१२,१३३/- (रुपये सोळा लाख बारा हजार एकशे तेहतीस फक्त) दि.१७/०६/२०२१ रोजी देय रक्कम आहे आणि त्यावरील पुढील व्याजदरासह देय तारखेपर्यंत,** अशा सर्व रकमेच्या अधीन राहील.
सुरक्षित आस्ति सोडविण्यासाठी संलग्न उपलब्ध वेळेमध्ये कर्जदाराचे लक्ष सरफेसी ॲक्ट २००२ च्या सेक्शन १३(८) अंतर्गत तरतुदींकडे वेधून घेतले जात आहे.
स्थावर मालमत्तेचा तपशील
फ्लॅट नं.०२ चे सर्व सामाईक भाग, बांधलेले क्षेत्रफळ ८८०.०० चौ.फूट. म्हणजेच ८१.७८ चौ.मी., 'साई आनंद अपार्टमेंट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या बिल्डिंग मध्ये, पहिल्या मजल्यावर, सर्वे नं.२५ हिसा नं. १ (भाग) वर बांधलेले, गाव.आगरटाकळी, नाशिक, ता.जि. नाशिक, नाशिक महानगरपालिकाच्या हद्दीत आणि खालीलप्रमाणे **चतु:सीमा : पूर्व :** फ्लॅट नं.३ आणि ४, **पश्चिम :** १२ मीटर रोड, **दक्षिण :** साइड मार्जिन, **उत्तर :** कॉलनी रोड.
दिनांक : १३/०२/२०२५ ठिकाण : नाशिक (टिप : स्थैर भाषांतर तफावत पडल्यास मूळ इंग्रजी ग्राह्य) सही/- अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.

पुणे-दिल्ली प्रवासादरम्यान 'मराठी साहित्ययात्री संमेलन'

रेल्वे प्रवासादरम्यान प्रथमच साहित्य संमेलनाचे आयोजन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : दिल्ली येथे होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवासादरम्यान फिरत्या चाकांवर प्रवासी साहित्य संमेलन भरवावे, या संकल्पनेतून 'मराठी साहित्ययात्री संमेलन' रंगणार आहे. पुण्यातून दिल्लीला घेऊन जाणाऱ्या रेल्वेला महान सेनानी महादजी शिंदे यांचे नाव देण्यात येणार असून, प्रत्येक बोगीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गडकिल्ल्यांची नावे दिली जाणार आहेत.

मराठी भाषामंत्री उदय सामंत या संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून, तेही रेल्वेने प्रवास करून मराठी साहित्ययात्री संमेलनात सहभागी होत आहेत. 'मराठी साहित्ययात्री संमेलना'त महाराष्ट्रातील विविध गावा-गावांमधून साहित्यिक, युवक, लोककलाकार, स्टँड अप कॉमेडियन, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर, तसेच शाहिरी व भजनी मंडळांचा मोठ्या संख्येने समावेश असणार आहे. प्रवासादरम्यान प्रत्येक बोगीत विविध साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. युवा साहित्यिक व कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे या उद्देशाने 'मराठी साहित्ययात्री संमेलन' भरविण्यात येत आहे, अशी माहिती या संमेलनाचे समन्वयक वैभव वाघ यांनी शनिवारी दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि सरहद संस्थेचे संजय नहार या वेळी उपस्थित होते.

जळगाव, ग्वाल्हेर येथे भव्य स्वागत

शिवजयंतीचे औचित्य साधून बुधवारी (१९ फेब्रुवारी) पुणे रेल्वे स्थानकावर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून 'गर्जा महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्र गीताच्या सामूहिक गायनानंतर पुण्यातून रेल्वे निघणार आहे. तत्पूर्वी पुस्तक दिंडीही काढली जाणार आहे. याच रेल्वे प्रवासात बाराशेहून अधिक साहित्यिक येणार असून, जळगाव आणि ग्वाल्हेर येथे स्थानिक नागरिक भव्य स्वागत करणार आहेत. दिल्ली स्थानकावर २० फेब्रुवारी रोजी रात्री रेल्वे पोहोचल्यानंतर पसायदानाच्या गायनाने 'मराठी साहित्ययात्री संमेलना'ची व पहिल्या टप्प्यातील प्रवासाची सांगता होणार आहे. यावेळी दिल्लीतील मराठीजन मोठ्या संख्येने स्वागतासाठी उपस्थित राहणार आहेत. परतीच्या प्रवासातदेखील हे संमेलन रंगणार असून, २५ फेब्रुवारी रोजी पुणे रेल्वे स्थानकावर या अनोख्या संमेलनाची सांगता होईल.

सर्व वादांचे न्यायालयीन खटल्यात रूपांतर योग्य नाही

सरन्यायाधीश संजीव खन्ना यांचे मत

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : सर्व वादांचे न्यायालयीन खटल्यात रूपांतर होणे योग्य नाही. मध्यस्थीच्या माध्यमातून समस्यांचे निराकरण हा योग्य पर्याय आहे, असे मत सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठाचा (एमएनएलयू) तिसरा दीक्षांत समारंभ शनिवारी विद्यापीठाच्या वर्धा मार्गावरील वारांगा परिसरात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. मंचावर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि विधि विद्यापीठाचे कुलपती न्या. भूषण गवई होते.

यावेळी सरन्यायाधीश म्हणाले, वाद संपुष्टात आणण्यासाठी मध्यस्थी हा सर्वोत्तम पर्याय आहे. प्रत्येक खटल्याला मानवी पैलू असतात. यात कुटुंबातील संपत्तीचा वाद असो किंवा समुदायांचा मूलभूत हक्कांसाठी संघर्ष, यावर कायद्याच्या, तसेच मानवी दृष्टिकोनातून उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याचेही न्या. खन्ना यांनी सांगितले.

ICICI Home Finance | कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई-४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : शॉप नं. ६०४ आणि ६०५, ललित रेगटा ग्रुप, ६वा मजला, रेगटा सुपरमस, चांडक सर्कल, तिडके कॉलनी, नाशिक, महाराष्ट्र-४२२ ००२.
[पाहा नियम ८(६)चे परंतुक]
स्थावर मत्तांच्या विक्रीकरिता सूचना
दी सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रुल्स, २००२च्या नियम ८(६) च्या परंतुकासोबत वाचावयाच्या दी सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ नुसार स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदारांना व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि.च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी जिचा ताबा घेतला आहे अशा प्रतिभूत धनकोकडे गहाण ठेवलेल्या/ भारित असलेल्या निम्नवर्णित स्थावर मालमत्ता, येथील खाली दिलेल्या संक्षिप्त तपशिलांनुसार ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''तेथे जे काही आहे'' तत्त्वावर विकण्यात येणार आहेत.

अ. क्र.	कर्जदाराचे/ सह-कर्जदाराचे/ हमीदाराचे/ कायदेशीर वारसदाराचे नाव. कर्ज खाते क्रमांक	असल्यास, ज्ञात बोजांसह प्रतिभूत मत्तेचे/ मत्तांचे तपशील	थकीत रकम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्ता पाहणीची तारीख व वेळ	लिलावाची तारीख व वेळ	लिलावाच्या तारखेपूर्वीचा एक दिवस	सरफेसी स्थिती
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)	(एच)	(आय)
१.	मोहम्मद आसिफ मोहम्मद इस्माइल मेमन (कर्जदार), फरिन मेमन मोहम्मद आसिफ (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र. एलएचएनएएस००००१३७९३६५ आणि एलएचएनएएस००००१३७९३८२	सदनिका क्र. ८, पहिला मजला, किंग्ज अपार्टमेन्ट- ए बिल्डिंग, कॅन्टोनमेन्ट हाऊस नं. १३०४/७ धारण करणारी, आनंद रोड, देवळाली कॅम्प, ता. आणि जिल्हा नाशिक.	रु. २४,५५,२३९/- ०६ फेब्रुवारी २०२५	रु. २३,०४,०००/- / रु. २,३०,४००/-	११ मार्च २०२५ रोजी स. ११.०० ते दु. ०३.०० वाजण्याच्या दरम्यान	१८ मार्च २०२५ दु. ०२.०० ते दु. ०३.०० वाजण्याच्या दरम्यान	१७ मार्च २०२५च्या सायं. ०५.०० वाजेपर्यंत	वास्तविक ताबा

आमची लिलाव एजन्सी मॅटेक्स नेट प्रा. लि. यांच्या वेबसाइटवर (यूआरएल लिंक- https://assets.matexauctions.com) ऑनलाइन लिलाव संचालित केला जाईल. १७ मार्च २०२५ च्या सायं. ०५.०० वाजण्यापूर्वी पुढील व्याजासह एकूण देणी प्रदान करण्याची अखेरची संधी गहाणकर्त्यांना/ कर्जदारांना देण्यात येत असून तसे न केल्यास वरील वेळापत्रकानुसार या प्रतिभूत मत्ता विकल्या जातील.
जाहिरातीच्या शीर्षस्थानी नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या शाखा कार्यालयीन पत्त्यावर १७ मार्च २०२५ रोजी सायं. ०४.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी संभाव्य बोलीदारांनी आरटीजीएस/ डिमाण्ड ड्राफ्ट (डीडी)द्वारा (पाहा स्तंभ ई) इसारा रकम ठेव (इरठे) सादर केली पाहिजे. संभाव्य बोलीदारांनी नोंदणी प्रपत्र आणि बोलीच्या अटी व शर्तीचे प्रपत्र यांची स्वाक्षरीकृत प्रतसुद्धा १७ मार्च २०२५ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी या जाहिरातीच्या शीर्षस्थानी नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडच्या शाखा कार्यालयीन पत्त्यावर सादर केली पाहिजे. इसारा रकम ठेवीचा डिमाण्ड ड्राफ्ट (डीडी) जाहिरातीच्या शीर्षस्थानी नमूद केलेल्या शाखा कार्यालयीन पत्त्यावर देय ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. ऑक्शन'' या नावावरील राष्ट्रीयीकृत/ शेडयूल्ड बँकेचा असावा.
पाहणी, लिलावाच्या अटी व शर्ती किंवा निविदा सादरीकरणसंदर्भातील कोणत्याही अधिक स्पष्टीकरणासाठी ९९२०८०७३०० वर आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्याशी संपर्क साधावा.
कोणतीही अधिक कारणे न देता कोणतीही बोली किंवा सर्व बोल्या नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे राखून ठेवण्यात आला आहे.
विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तीकरिता कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्या.
दिनांक : १६ फेब्रुवारी २०२५ | प्राधिकृत अधिकारी, ''आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड''
स्थळ : नाशिक | सीआयएन नंबर : यू६५९२२एमएच१९९९पीएलसी१२०१०६

बँक ऑफ महाराष्ट्र
तुमच्या स्वप्नातील मालमत्ता मिळवा
ई-लिलावासाठी आमंत्रण नोटीस
बँक ऑफ महाराष्ट्र आपल्या मालमत्तांच्या (निवासी आणि व्यावसायिक) विक्रीसाठी आयोजित ई-लिलावात सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदारांना आमंत्रित करत आहे.
स्थाने:
मुंबई | दिल्ली | पुणे
गोवा | शिर्डी | सोलापूर
बेळगाव | मालवण | बीड
EMD जमा करण्याची अंतिम तारीख : 27/02/25 संध्याकाळी 5 वाजेपर्यंत
ई-लिलावाची तारीख व वेळ : 27/02/25 सकाळी 11 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत
मालमत्तेची प्रत्यक्ष पाहणी 27 फेब्रुवारी 25, पर्यंत सकाळी 11 ते संध्याकाळी 5 दरम्यान पाहता येईल. कृपया पाहण्याच्या वेळेसाठी श्री. नितीश मेहरोत्रा - 750-3236-695 / श्री. रोहन पेंडके 797-7201-574 यांच्याशी संपर्क साधा.
ई-लिलाव BAANKNET पोर्टलद्वारे घेतला जाईल. EMD भरण्यासाठी कृपया www.baanknet.com/eauction-psb/home येथे नोंदणी करा.
अधिक माहितीसाठी भेट द्या:
www.bankofmaharashtra.in/tenders आणि https://baanknet.com/
दिनांक: 16/02/25
सहाय्यक महाव्यवस्थापक
कॉर्पोरेट सेवा विभाग